पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

पुणे महानगरपालिका
सभेचा वृत्तांत ( सभा क्रमांक १ )
शुक्रवार, दिनांक १९/४/२०२४, दुपारी ४.३० वाजता

पुणे महानगरपालिकेची मासिक (सर्वसाधारण) सभा (माहे एप्रिल २०२४ च्या कार्यपत्रिकेवरील कामकाजासाठी प्रथम दिनांक १९/४/२०२४ रोजी बोलविलेली) महानगरपालिकेच्या मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयात भरली होती.

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. डॉ राजेन्द्र ब भोसले, भा.प्र.से. | - | प्रशासक तथा महापालिका आयुक्त |
| २) | मा. रविंद्र बिनवडे, भा.प्र.से. | - | अति.महापालिका आयुक्त (जनरल) |
| ३) | मा. पृथ्वीराज बी.पी. | - | अति.महापालिका आयुक्त (इस्टेट) |
| ४) | मा. प्रशांत वाघमारे | - | शहर अभियंता |
| ५) | मा. डॉ. भगवान पवार | - | आरोग्य अधिकारी |
| ६) | मा. सौ. उल्का कळसकर | - | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ७) | मा. सौ. प्रतिभा पाटील | - | उपायुक्त (सेवकवर्ग व मालमत्ता व्यवस्थापन) |
| ८) | मा. संदिप कदम | - | उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) |
| ९) | मा. अनिरुध्द पावसकर | - | मुख्य अभियंता (पथ) |
| १०) | मा. युवराज देशमुख | - | मुख्य अभियंता (भवन) |
| ११) | मा. श्रीनिवास कंदुल | - | मुख्य अभियंता (विद्युत) |
| १२) | मा. सौ.निशा चव्हाण | - | मुख्य विधी अधिकारी |
| १३) | मा. अशोक घोरपडे | - | मुख्य उद्यान अधिक्षक |
| १४) | श्रीमती योगिता भोसले | - | प्रभारी नगरसचिव |

मा. डॉ.राजेंद्र भोसले, भा.प्र.से., प्रशासक तथा महापालिका आयुक्त हे अध्यक्षस्थानी होते.

**मा. प्रशासक :** सभा सुरु करावी.

**वृत्तांत कायम करणे.**

सभा क्र. ६७, दिनांक १५/३/२०२४ चा सभावृत्तांत कायम करणेसाठी.

**मा.प्रशासक :** सदर वृत्तांत हा पूर्वीचे प्रशासकांचे कालावधीतील असल्यामुळे, सदर सभेस उपस्थित अधिकारी ज्यांचे-ज्यांचे विषय होते, त्यांच्या देखील स्वाक्षरी सदर वृत्तांतावर घ्याव्यात.

**सदरचा १ (एक) वृत्तांत कायम करणेत आला.**

**मा.प्रशासक :** विषय घ्या.

**नगरसचिव :** माहे एप्रिल २०२४ कार्यपत्रिका. माहे एप्रिल २०२४ कार्यपत्रिकेवर दाखल करुन घेणेसाठी खालीलप्रमाणे विषय आलेले आहेत.

**विषय क्रमांक :- १/१५**

**संदर्भ-**
१) शासन निर्णय क्र.एनयुआर/२०१३/प्र.क्र.३३८/निवि ३३, दि.१८/२/२०१४
२) PMPML जा.क्र. PMPML/मुलेविअ/४३१४, दि.१३/१२/२०२३
३) मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/७४४,दि.२१/१२/२०२३
४) PMPML जा.क्र. PMPML/मुलेविअ/६१०३, दि.१३/३/२०२४
५) मुख्य लेखा व वित्त विभाग जा.क्र.मुले/५६६०,दि.२८/३/२०२४
६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/१४,दि.१५/४/२०२४ चे पत्र.
७) मा.स्थायी समिती ठराव क्र.१६, दि.१९/४/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार -

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून सन २०२३-२४ या वर्षातील संचलन तुटीपोटी मागणी करण्यात आलेली पुणे महानगरपालिकेच्या हिश्श्याची ६० टक्के रक्कम सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात समान मासिक हप्त्यात प्रतिमाह अग्रीम स्वरूपात PMPML संस्थेस आदा करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) PMPML संस्थेस मा.महापालिका आयुक्त यांचे मान्यतेने मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्र.३ च्या ठरावान्वये अपवादात्मक बाब म्हणून सन २०२३-२४ मध्ये उचल स्वरूपात आदा करण्यात आलेली रक्कम रू.३० कोटी (अक्षरी र.रू.तीस कोटी ) आदा करणेस पश्चात मान्यता मिळणेस व सदर सन २०२३-२४ मध्ये SE19A101 ठ इतर खर्चासाठी उचल (advance) या अर्थशिर्षकामधून उचल स्वरूपात आदा करण्यात आलेली रक्कम रू.३० कोटी पुणे महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकातील PMPML च्या संचलन तुटी पोटीचा हिस्सा - (RE58A101A) या अर्थशिर्षकामधून परत जमा (Recoupment ) करून घेणेस.

२) PMPML संस्थेच्या मागणीनुसार मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्र.२ सन २०२३-२४ या वर्षातील अंदाजित संचलनतूट पुणे महानगरपालिकेच्या ( ६० टक्के ) स्वामित्व हिश्श्यानुसार र.रू.४४०.४२ कोटी होत असून त्यापैकी सन २०२३-२४ मध्ये मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्र.३ अन्वये उचल स्वरूपात आदा करण्यात आलेले, रक्कम रू.३० कोटी ( अक्षरी र.रू.तीस कोटी ) समायोजित करून समायोजनानंतर उर्वरित रक्कम रू.४१०.४२ कोटी ( अक्षरी र.रू.चारशे दहा कोटी बेचाळीस लक्ष ) पुणे महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात (RE58A101A ) ४८अ, पीएमपीएमएलच्या संचलनामधील तुटीपोटीचा हिस्सा या अर्थशिर्षकांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदीमधून माहे एप्रिल २०२४ पासून प्रतिमहा र.रू.३४ कोटी ( अक्षरी र.रू.चौतीस कोटी ) याप्रमाणे १२ समान मासिक हप्त्यांपैकी ( माहे एप्रिल २०२४ ते जून २०२४) पुणे महानगरपालिकेकडून PMPML संस्थेस आदा करणेस.

३) सदर १२ हप्त्यांपैकी ११ हप्ते आदा केल्यानंतर उर्वरित हप्ते पुणे महानगरपालिकेच्या मा.मुख्य लेखापरीक्षक यांचेकडून PMPML संस्थेचे सन २०२३-२४ च्या ताळेबंदाचा आढावा लेखापरिक्षण यांचेकडून PMPML संस्थेचे सन २०२३-२४ च्या ताळेबंदाचा आढावा लेखापरिक्षण झालेनंतर,ताळेबंदानुसार निश्चित झालेली कमी/अधिक रक्कमेनुसार पीएमपीएमएल संस्थेस आदा करणेस.

४) सदर १२ हप्त्यांपैकी ३ हप्ते आदा केल्यानंतर उर्वरित रक्कम आदा करणेबाबत मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेमार्फत पुनरावलोकन करून निर्णय करण्यात यावा.

**मा.प्रशासक :** विषय दाखल करुन घेतला.

**एकूण १ (एक) विषय कार्यपत्रिकेवर दाखल करण्यात आला.**

**प्रशासक :** कार्यपत्रिकेवरील विषय घ्या.

विषय क्र. १

**संदर्भ-** १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.बाळा ओसवाल यांचे दि.२१/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१७८३,दि.२१/१२/२०२१
३) मनपा ठराव क्र.८१५,दि.१७/२/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२४,दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१६९,दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२१७,दि.१/११/२०२२
७) मनपा ठराव क्र.२६८,दि.१/१२/२०२२
८) मनपा ठराव क्र.३०१,दि.२८/१२/२०२२
९) मनपा ठराव क्र.३६९,दि.१७/२/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१,दि.२६/४/२०२३
११) मनपा ठराव क्र.६७,दि.२०/६/२०२३
१२) मनपा ठराव क्र.१२९,दि.२५/८/२०२३
१३) मनपा ठराव क्र.२०५,दि.२०/१०/२०२३

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम -२०१४ मध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र | संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीची अर्हता व नेमणुकांच्या पध्दती | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|---|---|---|
| १३९ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी -२ | उप अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन -२५% | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी शाखेची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक | पदोन्नती -१००% स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पदोन्नती -७५% | स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्या आस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | पदवी/पदविका ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे मनपाच्याआस्थापने वरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावर कार्यरत असणे आवश्यक |

(टीप :- पुणे महानगरपालिकेकडील शाखा अभियंता ( स्थापत्य ) या पदावरील सेवकांची पदोन्नतीची कुंठीता घालविण्यासाठी वरीलप्रमाणे पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम २०१४ मध्ये बदल करणे आवश्यक आहे.)
(टीप-सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.३७०, दि.१४/२/२०२४ चा झाला आहे. )

मा.प्रशासक : शाखा अभियंता व पुढे कशी पदोन्नती आहे? एंट्री कोणत्या लेवलवर होते?

मा.नगर अभियंता : आपल्याकडे कनिष्ठ अभियंता पदावर भरती प्रक्रिया होते. त्यानंतर पदोन्नतीने शाखा अभियंता होतो, पुढे सब इंजिनियर, डेप्युटी इंजिनियर, एक्झिकेटीव्ह इंजिनियर असे प्रमोशन आहेत.

मा.प्रशासक : आपण काही लेवलवर डायरेक्ट एंट्रीसुध्दा ठेवायला पाहिजे. आत्ताचे रिक्रूटमेंट रुल हे सर्व महानगरपालिकांना लागू आहेत का?

मा.अति.महा.आयुक्त(ज) : आपण एक्झिकेटीव्ह इंजिनियरला देखील एंट्री पॉइंट ठेवलेला आहे. जेणेकरुन पुढील पदांच्या पदोन्नती होऊ शकतील.

मा.प्रशासक : काही वेळेस एकाच वयाची व एकाच कॉलेजचे येथे येताना एक जण जे.ई. म्हणून येतो व एक जण एक्झीकेटीव्ह म्हणून येतो, असे होते. सीईटी व १२वी देऊनच तो इंजिनियरींगला येतो आणि एक जण खालच्या पदावर गेला व एक वरच्या पदावर गेलो. यामध्ये कसे आहे की, एक जण डायरेक्ट डेप्युटी कलेक्टर झाला, तो देखील ग्रॅच्युईट आहे व जो नायब तहसिलदार झाला तो देखील ग्रॅच्युईट आहे. नायब तहसिलदारचा तहसिलदार होतो, तहसिलदारचा डेप्युटी कलेक्टर होतो. आपल्या येथे जर शासनाने रुल्स बदलले असतील तर ठिक आहे, पण यापूर्वी असा ठराव गेला होता का?

मा.उपायुक्त (सेवकवर्ग) : आपले रिक्रूटमेंट रुल्स शासनाने मंजूर केलेले आहेत. त्यानंतर हा मा.सभासदांनी प्रस्ताव दिलेला आहे. यामध्ये आपला प्रशासनाचा अभिप्राय घेतला गेला नाही.

मा.मुख्य अभियंता (विद्युत) : यापूर्वी हा ठराव स्थायी समितीमध्ये मंजूर झाला आहे व तेथून मुख्यसभेच्या मान्यतेने शासनाकडे पाठवायचा आहे.

मा.उपायुक्त (सेवकवर्ग) : हा सभासदांचा प्रस्ताव आहे, आपल्याला दफ्तरी दाखल करता येईल.

मा.प्रशासक : प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्यासाठी ते सभासद कुठे आहेत? ते सदस्य पुढे निवडून येऊ, न येवो, पण त्यांचा प्रस्ताव आपण कसा दफ्तरी दाखल करायचा? सदरचा विषय माहे जून २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा.

ठराव क्रमांक :- १

संदर्भ- १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.बाळा ओसवाल यांचे दि.२१/१२/२०२१ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र.१७८३,दि.२१/१२/२०२१
३) मनपा ठराव क्र.८१५,दि.१७/२/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२४,दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१६९,दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२१७,दि.१/११/२०२२
७) मनपा ठराव क्र.२६८,दि.१/१२/२०२२
८) मनपा ठराव क्र.३०१,दि.२८/१२/२०२२
९) मनपा ठराव क्र.३६९,दि.१७/२/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१,दि.२६/४/२०२३
११) मनपा ठराव क्र.६७,दि.२०/६/२०२३
१२) मनपा ठराव क्र.१२९,दि.२५/८/२०२३
१३) मनपा ठराव क्र.२०५,दि.२०/१०/२०२३
१४) मनपा ठराव क्र.२७९, दि.२०/१२/२०२३
१५) मनपा ठराव क्र.३७०, दि.१४/२/२०२४

विषय– पुणे महानगरपालिका सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम –२०१४ मध्ये दुरूस्ती करणेबाबत.

----

विषय क्र. १ माहे जून २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घेण्यात यावा.

**निर्णय : सदर विषय तहकुबी संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.**

विषय क्र. २

संदर्भ :– १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.महेश वाबळे यांचे दि.११/१/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९८३,दि.११/१/२०२२
३) मनपा ठराव क्र.८०४, दि.१७/२/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२५, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७०, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२६९, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७०, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.२, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.६८, दि.२०/६/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१३०, दि.२५/८/२०२३
११) नपा ठराव क्र.२०६, दि.२०/१०/२०२३

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

सॅन ॲड्स औंध पुणे ह्या जाहिरातक्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीला ६० फुट X ३० फुट महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मुख्य रस्त्यालगत ५० ठिकाणी अद्यायावत शौचालय महानगरपालिकेसाठी मोफत बांधण्यासाठी, त्यावरील जाहिरात हक्क व जागेसाठी २० वर्षाकरिता करार करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे .

( टीप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.३७१, दि.१४/२/२०२४ चा झाला आहे. )

**मा.प्रशासक :** हा विषय कोणत्या विभागाशी संबंधीत आहे? आरोग्य विभाग, घनकचरा की अन्य कोणाचे आहे? स्कायसाईन हे एक्झिक्युशन डिपार्टमेंट झाले. टॉयलेट बांधणे हा कोणत्या विभागाचा आहे, टॉयलेट बांधायचे की नाही व ही ५० ठिकाणे कुठली?

**मा.अति.आयुक्त (इ) :** आपण स्वच्छ सर्व्हेक्षणमध्ये आवश्यकतेनुसार टॉयलेट बांधलेले आहेत. तसेच जी रिक्वायरमेंट आहे त्याप्रमाणे टॉयलेट बांधता येतील.

**मा.प्रशासक :** सॅन ॲडस् औंध पुणे हे जाहिरात क्षेत्रातील एक्सपर्ट असतील. पण ते टॉयलेट ब्लॉक बांधण्यामध्ये एक्सपर्ट कसे असतील आणि असे एकच जाहिरात संस्थेला काम कसे देता येईल? स्थायी समितीमध्ये एखादा विषय येण्यापूर्वी डिपार्टमेंटचे ओपिनियन घेतच नाहीत का?

**मा.अति.आयुक्त (ज) :** काही प्रस्ताव हे स्थायी समितीमध्ये मा.सभासदांकडून डायरेक्टली मांडले जातात. त्यामध्ये डिपार्टमेंटचा अभिप्राय घेतला जात नाही.

**मा.मुख्य अभियंता (विद्युत) :** मा.स्थायी समितीमध्ये ठराव झाल्यानंतर त्याचे एक्झिक्युशन करण्याचा अधिकार मा.आयुक्तांना आहे.

**मा.प्रशासक :** एखादा ठराव झाल्यानंतर तुम्हांला तो इम्प्लिमेंट करणे भाग आहे.

**मा.मुख्य अभियंता (विद्युत) :** आपण सगळेच ठरावाचे इम्प्लिमेंटेशन करावे असे काही नाही.

**मा.प्रशासक :** शासन देखील असे ठराव विखंडीत करु शकते.

**मा.अति.महा.आयुक्त (ज) :** काही वेळेस मा.सभासद असे प्रस्ताव देतात की जे प्रशासनाला अजिबात माहिती नसतात. सदरचे प्रस्ताव आपण विखंडनासाठी पाठवू शकतो.

**मा.प्रशासक :** विखंडनासाठी पाठविणे म्हणून we dont have trust असे झाले ना. मग आपण प्रोसिजर फॉलो का करता नाही. जर एखादा प्रस्ताव पटला तर ठिक आहे. यामध्ये डिपार्टमेंटचा अभिप्राय घ्यावा. तसेच यामध्ये आपण एक्सप्रेशन ऑफ इंट्रेस्ट मागवा. ही एक जाहिरात कंपनी आहे, ती जाहिरात क्षेत्रात चांगली असेल, पण ती टॉयलेट ब्लॉक बांधणार ते कसल्या पध्दतीचे बांधणार आहेत? तसेच ते रस्त्याच्या कडेला म्हणतात तर ती कोणती ठिकाणे आहेत?

**मा.अति.महा.आयुक्त (इ) :** आम्ही स्टँडींगचा प्रस्ताव स्टडी करतो. डिपार्टमेंटकडे देखील जागांबाबत डिटेल्स नाहीत.

**मा.प्रशासक :** आपल्याकडे जी.बी.मध्ये त्यावर डिलेब्रेशन होते का?

**मा.अति.महा.आयुक्त (ज) :** होय, चर्चा होत असते.

**मा.प्रशासक :** हे एक्झामिन करा. ते म्हणतात की, २० वर्षासाठी करार करायचा, पण २० वर्षासाठी एखाद्याला ते देणे म्हणजे त्याला ती प्रॉपट्री दिल्यासारखे आहे. तेथे त्याची जाहिरातच लागेल. त्याच्या प्रस्तावात असे काही आहे का की, पहिल्यांदा ५० टॉयलेट ब्लॉक बांध व ते आम्ही सांगू त्या क्वॉलिटीचे असतील व त्यानंतर आम्ही तुला जाहिरातीची परवानगी देऊ. ज्याठिकाणी प्राईम लोकेशन आहे, त्या ठिकाणी तो जाहिरातीसाठी ते बांधेल पण जेथे काही नाही त्याठिकाणी तो ते बांधणार नाही.

**मा.अति.महा.आयुक्त (ज) :** त्या संस्थेने तसा कोणताही प्रस्ताव दिलेला नाही. तो फक्त मा.सभासदांना अॅप्रोच झाला व त्यांनी हा प्रस्ताव दिलेला आहे.

**मा.अति.महा.आयुक्त (इ) :** यामध्ये आम्ही डिपार्टमेंटचा अभिप्राय घेऊ. कुठे–कुठे आवश्यकता आहे, ते देखील पाहिले जाईल.

**मा.प्रशासक :** आपल्याला जिथे–जिथे डिफीकल्टी आहे, त्या डिफीकल्टीमध्ये व स्लम पॉकेटस्मध्ये त्याने हे बांधावे.

**मा.मुख्य अभियंता (विद्युत) :** यामध्ये त्याही अॅडव्हरटायझींग होणार नाही.

**मा.प्रशासक :** हे आपण त्याच्या बिझनेस परपजसाठी देत नाही. त्याच्या अरनिंग करीता महापालिका प्रॉपर्टी नाही. महापालिकेला जेथे युटिलिटी पाहिजे तेथे दिले पाहिजे. लक्स, कोझी, बिटेक्स इ. जाहिराती आहेत, तशा त्यांनी स्लममध्ये लावाव्यात, त्यांनी काही फक्त पी एन गाडगीळ यांचीच जाहिरात लावावी असे काही नाही. तरी आपण हे तपासून घ्या.

**मा.अति.महा.आयुक्त (ज) :** या प्रस्तावामध्ये काहीही दिलेले नाही किंवा कोणतेही कागद नाहीत.

**मा.प्रशासक :** यामध्ये आपण संबंधीत डिपार्टमेंटचा अभिप्राय घ्यावा. लोकेशन फिक्स करावे व त्याठिकाणी त्याने करणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी महापालिका कन्स्ट्रक्ट करु शकत नाही पण तेथे नागरिकांसाठी आवश्यकता आहे, त्याठिकाणी आपण हे करावे. तसेच यामध्ये एकच संस्था आहे, आणखी कोणी येते का हे ही पहा. तसेच हा सदस्यांचा प्रस्ताव आहे, ते येथे नसताना त्यांचे प्रस्ताव फेटाळणे योग्य नाही. हा प्रस्ताव आपल्याला अॅबियेन्समध्ये ठेवला येईल का? आपल्याला यावर कधी तरी डिसिजन घ्यावा लागेल. तरी सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करावा.

ठराव क्रमांक :– २

संदर्भ :– १) मा.सौ.अर्चना पाटील व मा.महेश वाबळे यांचे दि.११/१/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९८३,दि.११/१/२०२२
३) मनपा ठराव क्र.८०४, दि.१७/२/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२५, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७०, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२६९, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७०, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.२, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.६८, दि.२०/६/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१३०, दि.२५/८/२०२३
११) नपा ठराव क्र.२०६, दि.२०/१०/२०२३
१२) मनपा ठराव क्र.२८०, दि.२०/१२/२०२३
१३) मनपा ठराव क्र.३७१, दि.१४/२/२०२४

विषय– सॅन अॅड्स औंध पुणे ह्या जाहिरातक्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीला ६० फुट द ३० फुट महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मुख्य रस्त्यालगत ५० ठिकाणी अद्यायावत शौचालय महानगरपालिकेसाठी मोफत बांधण्यासाठी, त्यावरील जाहिरात हक्क व जागेसाठी २० वर्षाकरिता करार करण्याबाबत.

––––

विषय क्र. २ चा विचार आचार संहितेनंतर करण्यात यावा.

निर्णय : सदर विषय तहकुबी संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क. ३

संदर्भ :- १) मा. महेश वाबळे, मा. सौ. अर्चना पाटील, मा.सौ. उज्ज्वला जंगले, मा. प्रदीप गायकवाड, मा. राजाभाऊ लायगुडे, मा.विशाल तांबे, मा.राहुल भंडारे , मा. सौ. अश्विनी कदम, मा. श्रीमती लता राजगुरू, मा.सौ. मानसी देशपांडे , मा. सौ. सुनिता गलांडे यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३५, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.५, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२६, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७१, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२७०, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७१, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.३, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.६९, दि.२०/६/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१३१, दि.२५/८/२०२३
११) मनपा ठराव क्र.२०७, दि.२०/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

PMPML च्या सेवकांचे (चार कोटी )आरोग्य बिलासाठी ४ कोटी देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.
( टीप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.३७२, दि.१४/२/२०२४ चा झाला आहे. )

**मा.प्रशासक :** पीएमपीएमएलच्या कर्मचाऱ्यांचे पगारही आपणच करतो का?

**मा.अति.महा.आयुक्त (ज) :** आपण टेक्निकली त्यांची संचलन तुट देतो. त्यामधून ते कर्मचाऱ्यांचे पगार करतात.

**मा.प्रशासक :** हा डिसिजन पीएमपीएमएलने घेणे आवश्यक आहे.

**मा.अति.महा.आयुक्त (ज) :** पीएमपी कर्मचाऱ्यांचे बऱ्याच दिवसांपासून मागणी होती, त्यांचे आरोग्याची बिले वेळेवर निघत नाहीत तर विशेष बाब म्हणून मा.सभासदांनी याबाबतचा प्रस्ताव दिला होता. आपण टेक्निकली त्यांची संचलन तुट देऊ शकतो इतर कोणताही निधी देऊ शकत नाही.

**मा.प्रशासक :** पीएमपीएमएल ही एक कंपनी आहे, त्यांनी फक्त आपल्याकडेच निधी का मागावा, त्यांनी पीएमआरडीए व पीसीएमसीकडे निधी मागावा.

**मा.अति.महा.आयुक्त (ज) :** शासन जी.आर. होता की, त्यांचे ऑपरेशनल लॉसेस जे काही होतील ते पीएमसी व पीसीएमसी यांनी द्यायचे आहेत. तसेच जी.आर.मध्ये पीएमआरडीएचा उल्लेख नाही.

**मा.प्रशासक :** सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करण्यात यावा.

ठराव क्रमांक :– ३

संदर्भ :- १) मा. महेश वाबळे, मा. सौ. अर्चना पाटील, मा.सौ. उज्ज्वला जंगले, मा. प्रदीप गायकवाड, मा. राजाभाऊ लायगुडे, मा.विशाल तांबे, मा.राहुल भंडारे , मा. सौ. अश्विनी कदम, मा. श्रीमती. लता राजगुरु, मा.सौ. मानसी देशपांडे , मा. सौ. सुनिता गलांडे यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३५, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.५, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२६, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७१, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२७०, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७१, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.३, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.६९, दि.२०/६/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१३१, दि.२५/८/२०२३
११) मनपा ठराव क्र.२०७,दि.२०/१०/२०२३

१२) मनपा ठराव क्र.२८१, दि.२०/१२/२०२३
१३) मनपा ठराव क्र.३७२, दि.१४/२/२०२४

विषय– **PMPML** च्या सेवकांचे (चार कोटी )आरोग्य बिलासाठी ४ कोटी देण्याबाबत.

----

विषय क्र. ३ चा विचार आचारसंहितेनंतर करण्यात यावा.

निर्णय : सदर विषय तहकुबी संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्र ४

संदर्भ :– १) मा.सौ.वर्षा तापकीर, मा.विशाल तांबे, मा.सौ.मानसी देशपांडे व मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३६, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.६, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२७, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७२, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२७१, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७२, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.४, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.७०,दि.२०/६/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१३२,दि.२५/८/२०२३
११) मनपा ठराव क्र.२०८,दि.२०/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पी.एम.पी.एम.एल च्या सेवकांसाठी ७ व्या वेतन आयोगापोटी र.रू. ६ कोटी ( सहा कोटी )देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( टीप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.३७३, दि.१४/२/२०२४ चा झाला आहे. )

मा.प्रशासक : सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करण्यात यावा.

ठराव क्रमांक :– ४

संदर्भ :– १) मा. सौ. वर्षा तापकीर, मा. विशाल तांबे, मा.सौ. मानसी देशपांडे व मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३६, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.६, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२७, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७२, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२७१, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७२, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.४, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.७०,दि.२०/६/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१३२,दि.२५/८/२०२३
११) मनपा ठराव क्र.२०८,दि.२०/१०/२०२३
१२) मनपा ठराव क्र.२८२, दि.२०/१२/२०२३
१३) मनपा ठराव क्र.३७३, दि.१४/२/२०२४

विषय– पी.एम.पी.एम.एल च्या सेवकांसाठी ७ व्या वेतन आयोगापोटी र.रू. ६ कोटी ( सहा कोटी )देण्याबाबत.

----

विषय क्र. ४ चा विचार आचारसंहितेनंतर करण्यात यावा.

निर्णय : सदर विषय तहकुबी संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्र ५

संदर्भ :- १) मा. सौ. उज्वला जंगले व मा. सौ. मनिषा कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३७, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.७, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२८, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७३, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२७२, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७३, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.५, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.७१, दि.२०/६/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१३३, दि.२५/८/२०२३
११) मनपा ठराव क्र.२०९, दि.२०/१०/२०२३

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

हिंदुस्थानाच्या वायव्य सीमेवर खैबर व बोलन खिंडीतून सुमारे २००० वर्षे अनेक परकीय आक्रमकांनी आपल्या देशावर वारंवार आक्रमणे करून आपल्या देशाचे लचके तोडले होते. अशा आक्रांतांपैकी एक अफगाणिस्थानाचा बादशाह अहमदशाह अब्दाली सन १७६० साली पाचव्यांदा आक्रमण करून आला. तेव्हा अशा पाशवी आक्रमणाचा बिमोड करून देशाचे संरक्षण करण्याच्या हेतूने पुण्यातील शनिवार वाडा येथून सदाशिवराव भाऊंच्या नेतृत्वात मराठा सैन्याने उत्तरेकडे कूच केले. दिनांक १४ जानेवारी १७६१ रोजी हरियाणा मधील पानिपतावर दोन्ही सैन्यांमध्ये तुंबळ युद्ध झाले. या पानिपताच्या तिसऱ्या युद्धात मराठा सैन्यांनी आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली व धगधगत्या राष्ट्रयज्ञकुंडात आपल्या देशासाठी आपल्या प्राणांच्या सुमारे सव्वा लाख आहुत्या दिल्या. मराठा सैन्यांनी आपल्या शौर्याने परकीय आक्रमकांना जोरदार तडाखा देऊन हिंदुस्थानाच्या वायव्य सीमेवर खिंडीतून येणारी सततची आक्रमणे थांबविली. खैबर व बोलन खिंडी आपल्या रक्तामांसाच्या चिखलाने लिंपून कायमच्या बंद केल्या आणि हिंदुस्थानावर चालून येणारा आक्रमक शत्रूंच्या वाटा रोखल्या. मराठे उत्तरेत गेले ते मातृभूमीच्या सीमा निश्चित करण्यासाठी, प्राणपणाने लढले ते हिंदुस्थानाच्या भौगोलिक सीमा राखण्यासाठी आणि लढता लढता हौतात्म्य पावले ते श्रीशिवछत्रपतींनी दाखविलेल्या स्वप्नपूर्तीसाठी आणि स्वाभिमान रक्षणासाठी.

पानिपतावरील पराक्रमी योद्ध्यांना व हौतात्म्यांना मानवंदना म्हणून महाराष्ट्रातील तरूण हरियाणा मधील ''कालाआम पानिपत रणभूमी स्मारक'' येथून शौर्य ज्योत प्रज्वलित करून पानिपत ते पुणे मार्गे दिल्ली, आगरा, ग्वाल्हेर, उज्जैन, इंदूर, धार या मार्गे अखंडितपणे पायी धावत घेऊन येणार आहेत. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाला साजेसे असे शूर हुतात्म्यांचे चिरस्थायी स्मारक पुण्यामध्ये व्हावे या उद्देशाने हि शौर्य ज्योत हौतात्म्य भूमी पानिपता वरून तत्कालीन राजकीय राजधानी पुणे येथे आणली जाईल. दिल्लीतील अमर जवान ज्योती धर्तीवर चिरंतन (३६५ दिवस २४ तास) शौर्य ज्योतीच्या रूपाने 'हौतात्म्य स्मारक' शनिवार वाड्यासमोरील थोरले बाजीराव पेशवे यांची अश्वारूढ मूर्ती आणि राष्ट्रध्वज तिरंगा याच्या मधील मोकळ्या जागेमध्ये स्थापन करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.
( टीप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.३७४, दि.१४/२/२०२४ चा झाला आहे. )

**मा.प्रशासक :** हा ठराव स्थायी समितीमध्ये कधी मंजूर झाला आहे?

**प्र.नगरसचिव :** मा.स्थायी समितीमध्ये दि.११/३/२०२२ मध्ये हा ठराव मंजूर झाला आहे.

**मा.प्रशासक :** तेंव्हापासून यावर निर्णय झालेला नाही का?

**प्र.नगरसचिव :** सदर ठरावावर तत्कालीन मुख्यसभेने मंजूरी दिली नव्हती.

**मा.प्रशासक :** सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करावा.

ठराव क्रमांक :– ५

संदर्भ :- १) मा. सौ. उज्वला जंगले व मा. सौ. मनिषा कदम यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३७, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.७, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२८, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७३, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२७२, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७३, दि.१७/२/२०२३

८) मनपा ठराव क्र.५, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.७१, दि.२०/६/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१३३, दि.२५/८/२०२३
११) मनपा ठराव क्र.२०९, दि.२०/१०/२०२३
१२) मनपा ठराव क्र.२८३,दि.२०/१२/२०२३
१३) मनपा ठराव क्र.३७४, दि.१४/२/२०२४

विषय– दिल्लीतील अमर जवान ज्योती धर्तीवर चिरंतन (३६५ दिवस २४ तास) शौर्य ज्योतीच्या रूपाने 'हौतात्म्य स्मारक' शनिवार वाड्यासमोरील थोरले बाजीराव पेशवे यांची अश्वारूढ मूर्ती आणि राष्ट्रध्वज तिरंगा याच्या मधील मोकळ्या जागेमध्ये स्थापन करण्याबाबत.

----

विषय क्र.५ चा विचार आचारसंहितेनंतर करावा.

निर्णय : सदर विषय तहकुबी संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्र ६

संदर्भ :- १) मा.सौ.लता धायरकर यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३८, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.८, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२९, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७४, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२७३, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७४, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.६, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.७२,दि.२०/६/२०२३
१०) मनपा ठराव क्र.१३४,दि.२५/८/२०२३
११) मनपा ठराव क्र.२१०, दि.२०/१०/२०२३

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र. २१ ब, मधील स.नं. ७७, पिंगळे वस्ती, मुंढवा येथील जागेवर (अंदाजे ०.४४९ हेक्टर) चिल्ड्रन प्ले ग्राऊंडचे आरक्षण आहे. सदर चिल्ड्रन प्ले ग्राऊंड त्वरीत विकसित करून लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी बसविण्यात यावीत व तदनुषंगिक कामे करण्यात यावीत. सदर कामांसाठी लागणारी तरतूद ही सन २०२१-२०२२ च्या अखर्चित रकमेतून (र.रू. ४० लाख) करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

( मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

(टीप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.३७५,दि.१४/२/२०२३ चा झाला आहे.)

**मा.प्रशासक :** हा विषय सन २०२१–२२ या वर्षातील आहे. अनस्पेंड रक्कमा ते वर्ष संपल्यानंतर लॅप्स होतात.

मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी : सदरची मागणी सन २०२१–२२ च्या अखर्चित रकमेतून करण्याबाबत त्यावेळी प्रस्ताव दिला होता. परंतु त्याला मंजूरी मिळालेली नाही.

**मा.प्रशासक :** सदरचा विषय माहे जून २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा.

ठराव क्रमांक :– ६

संदर्भ :- १) मा.सौ.लता धायरकर यांचे दि. ११/०३/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५३८, दि.११/३/२०२२
३) मनपा ठराव क्र.८, दि.११/४/२०२२
४) मनपा ठराव क्र.१२९, दि.२५/७/२०२२
५) मनपा ठराव क्र.१७४, दि.२३/९/२०२२
६) मनपा ठराव क्र.२७३, दि.१/१२/२०२२
७) मनपा ठराव क्र.३७४, दि.१७/२/२०२३
८) मनपा ठराव क्र.६, दि.२६/४/२०२३
९) मनपा ठराव क्र.७२,दि.२०/६/२०२३

१०) मनपा ठराव क्र.१३४,दि.२५/८/२०२३
११) मनपा ठराव क्र.२१०, दि.२०/१०/२०२३
१२) मनपा ठराव क्र.२८४,दि.२०/१२/२०२३
१३) मनपा ठराव क्र.३७५,दि.१४/२/२०२४

विषय– प्रभाग क्र. २१ ब, मधील स.नं. ७७, पिंगळे वस्ती, मुंढवा येथील जागेवर (अंदाजे ०.४४९ हेक्टर) चिल्ड्रन प्ले ग्राऊंडचे आरक्षण आहे. सदर चिल्ड्रन प्ले ग्राऊंड त्वरीत विकसित करून लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी बसविण्यात यावीत व तदनुषंगिक कामे करण्यात यावीत. सदर कामांसाठी लागणारी तरतूद ही सन २०२१–२०२२ च्या अखर्चित रकमेतून (र.रू. ४० लाख) करण्याबाबत.

----

विषय क्र. ६ माहे जून २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घेण्यात यावा.

निर्णय : सदर विषय तहकुबी संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्र. ७

संदर्भ–
१) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील ठराव क्र. ६/३३१, दि.२९/८/२०१९.
२) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील ठराव क्र. ६/५८, दि.२९/४/२०२०.
३) मा. स्थायी समिती ठराव क्र. २२०३, दि.१/०२/२०२२ रोजीचे पत्र.
४) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडीलआ.क्र. एफएमओ/४६०, दि.२७/७/२०२० रोजीचे पत्र.
५) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.३८४, दि. १०/७/२०२२ रोजीचे पत्र.
६) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.४००, दि. २०/७/२०२० रोजीचे पत्र.
७) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.४०३, दि. २०/७/२०२० रोजीचे पत्र.
८) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.४०४, दि. २०/७/२०२० रोजीचे पत्र.
९) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३६७, दि. २९/९/२०२० रोजीचे पत्र.
१०) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३६९, दि. ३०/९/२०२० रोजीचे पत्र.
११) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३८२, दि. १/१०/२०२० रोजीचे पत्र.
१२) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३८३, दि. १/१०/२०२० रोजीचे पत्र.
१३) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१४०५, दि. ८/१०/२०२० रोजीचे पत्र.
१४) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१४०९, दि. ९/१०/२०२० रोजीचे पत्र.
१५) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१७२७, दि. ३/१२/२०२० रोजीचे पत्र.
१६) महात्मा फुले मंडई क ार्यालयाकडील आ.क्र.१७४३, दि. २४/३/२०२२ रोजीचे पत्र.
१७) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१७४२, दि. २४/०३/२०२२ रोजीचे पत्र.
१८) दि. ३०/०९/२०२० व दि. ६/१०/२०२२ मा.अति.महापालिका आयुक्त (वि) व मा. महापालिका आयुक्त यांचे आदेशानुसार.
१९) दि. १०/०७/२०२१ रोजी मा. महापालिका आयुक्त यांचे तोंडी आदेशानुसार.
२०) विधी विभाग, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील जा.क्र.१३३९, दि.१३/६/२०२२.
२१) मालमत्ता व व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील जा.क्र. २१७९, दि.२३/०६/२०२२.
२२) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मंडई/११ दि.१२/४/२०२३ चे पत्र.
२३) स्थायी समिती ठराव क्र.५२,दि.१७/४/२०२३
२४) मनपा ठराव क्र.४९, दि.२६/४/२०२३
२५) मनपा ठराव क्र.५१, दि.३०/५/२०२३
२६) मनपा ठराव क्र.७३, दि.२०/६/२०२३
२७) मनपा ठराव क्र.१३५, दि.२५/८/२०२३
२८) मनपा ठराव क्र.२११,दि.२०/१०/२०२३

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

मंडई विभागाकडील गाळ्यांचा करारनामा व नवीन मुल्यांकना नुसार भाडे वाढ करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) कोरोना काळामध्ये मंडई अथवा इतर सार्वजनिक ठिकाणावर संचार बंदी असल्याने व पर्यायाने व्यवसाय बंद असल्याने मंडई विभागाकडून पुणे शहरातील सर्व मंडई मधील गाळेधारकांचे त्यांचे मागणीनुसार दि.०१/४/२०२० ते ३१/३/२०२१ अखेर, भाडे माफ करणेस होईल तसेच मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद संदर्भ क्र.०२ चे ठरावान्वये दि.०१/४/२०२० पासून पूर्वलक्षी प्रभावाने भाडे आकारणी करणेस.

२) नवीन मुल्यांकना नुसार मंडई विभागाकडे मा. मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून प्राप्त झालेले गाळ्यांचे मासिक दर हे आता असलेल्या मासिक भाडे रकमेच्या अनुक्रमे ५,६,७ व ८ पटीने (टप्प्याने) असे खालील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे ४ वर्ष करणेस.

| अ.क्र. | वर्ष | भाडेवाढपट |
|---|---|---|
| १ | एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ | ५ |
| २ | एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ | ६ |
| ३ | एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ | ७ |
| ४ | एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ | ८ |

३) सन २०२१-२०२२ पासून पुढे ३० वर्ष मुदतीचा करारनामा पुणे शहरातील सर्व मंडई मधील सर्व गाळाधारकांसमवेत करणेस.

४) मुंबई क्राफर्ड मार्केटच्या धर्तीवर पुणे शहरातील सर्व मंडई मधील सर्व गाळ्यांचे बांधकाम व गाळा दुरूस्ती करणेस.

५) मंडई नियमावलीनुसार गाळेधारकांना भाजी विक्री व्यवसाय व्यतिरिक्त इतर व्यवसाय करणे तसेच व्यवसायात बदल करणेबाबत परवानगी देणेस.

६) सन एप्रिल २०२५ पासून नव्याने मुल्यांकन करून भाडे निश्चित करून आकारणी करणेबाबत.

७) सन एप्रिल २०२५ साठी निश्चित झालेल्या भाडेदरात पुढील प्रत्येक वर्षी १२% भाडेवाढ करणेस.

(टीप-सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०२४ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.३७६, दि.१४/२/२०२४ चा झाला आहे. )

**मा.प्रशासक :** यातील पहिल्या प्रस्तावामध्ये त्यांना भाडे माफ करावे असे म्हंटले आहे, जर त्यांनी भाडे भरलेले असेल तर माफीचा मुद्दा येतो, त्यांनी भाडे भरलेले आहे का?

**मा.मुख्य अभियंता :** त्यांनी कोरोना काळामध्ये मंडई बंद असल्यामुळे आपल्याकडे तशी मागणी केली आहे.

**मा.प्रशासक :** आपण ५ टाईम भाडेवाढ करत आहोत का?

**मा.मुख्य अभियंता :** पूर्वी अगदी माफक भाडे होते. काही ठिकाणी अगदी ५० रुपये भाडे होते त्याठिकाणी आपण ५०० रुपये केले तर ते १० पट होते. वास्तविक आपला दर कमी आहे, पण पूर्वीच्या भाड्यापेक्षा ते जास्त पटीमध्ये दिसून येत आहेत.

**मा.प्रशासक :** किती स्क्वेअर फुटाचे गाळे आहेत? पूर्वीचे गाळे असल्यामुळे १६, ३२, ३४ स्क्वे.फुटाचे गाळे असतील. तेथे खाली माल ठेवण्यासाठी काही जागा देखील असेल, पण आपणास एवढी सरसकट वाढ करता येईल का? तसेच टोटल किती गाळे आहेत, टोटल सगळे मिळून १६००-१७०० गाळे असतील का? यामध्ये आपल्याला ९०टक्के प्रिमियम भरुन घेऊन नाममात्र भाडे म्हाडा किंवा इतर एजन्सीप्रमाणे घेता येईल का? तसेच मार्केट रिजर्व्हेशनखाली असलेल्या जागांमध्ये आपल्याकडे गाळे ताब्यात आलेले आहेत का? त्याठिकाणी तुम्हांला ऑक्शन करावे लागेल. जेथे पोटेंशियल आहे असे काही कॅटेगरी ए,बी,सी केल्या आहेत का? जे प्राईम लोकेशनचे गाळे आहेत, त्याठिकाणी प्रिमियम जास्त आकारुन द्यावे. प्रिमियम आकारणी करुन नाममात्र भाडे निश्चित करता येईल. नाहीतर आपल्याला भाडे कलेक्शनलासुध्दा भाड्यापेक्षा जास्त खर्च येणार आहे. पूर्वीच्या काळी गाळ्यांचा आकार छोटा होता कारण ते डोक्यावर एक पाटी आणून धंदा करायचे, स्टोअरींग कपॅसिटी देखील कमी होती. परंतु आता त्यांना गाळे महत्वाचे आहेत, कारण तेथे फक्त स्टोअरींग करत असणार व त्यांचा प्रमूख धंदा हा बाहेरच होत असणार आहे. तो त्यांचा स्टोरेज स्पॉट झाला आहे. Any Tax you cannot be raise more than 3 times, that is the thumb rule. आपण कोणतीही भाडेवाढ करताना तीन पटच्या वर करु शकत नाही हा थम रुल आहे. परंतु यांच्याकडे ५० ते १०० वर्षापासून गाळे असतील तर आपली भाडेवाढीबाबत निश्चित धोरण असले पाहिजे. आपली लीज पॉलिसी काय आहे? शासनाचे लीजेस, महापालिकेचे लीजेस, इस्टेटचे लीजेस, बॉम्बे इम्प्रूव्हमेंटचे लीजेस त्यानंतर म्हाडाचे लीजेस यामध्ये सुप्रिम कोर्टाने असे आदेश दिले आहेत की, एकदा तुम्ही त्याला ३० वर्षाच्या लीजने दिल्यानंतर तुमचा इंट्रेस्ट हा फक्त २५% असला पाहिजे व त्यांचा ७५टक्के इंट्रेस्ट होता. त्या बेसिसवर तुम्हांला लीज रिन्युअलची गव्हर्नमेंटची पॉलिसी आहे ती सुध्दा आता १२-१२ अशी पॉलिसी आहे आणि आता हे सेटल प्रिन्सिपल आहे. त्यामुळे यामध्ये आत्ताच्या रेटमध्ये जे काही असेल त्यामध्ये ९० परसेंट प्रिमियम घ्या व बाकीचे नाममात्र भाडे ठेवा. यासाठी तुम्ही हे सर्व चेक करा. मग त्याच्यानंतर subsiquiet transfers म्हणजे this will be stall charges म्हणजे स्टॉलसाठी व hardship साठी नाममात्र भाडे पाहिजे व त्याने विकला तर त्याला अन्य चार्जेस पाहिजे. अशी काही पॉलिसी करा जी गव्हर्नमेंटच्या इतर डिपार्टमेंटच्या बरोबर असेल. एकच गव्हर्नमेंट असेल तर पॉलिसी एकच पाहिजे. तसेच आपण या सर्व गाळ्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट केले आहे का? आपण याबाबत निर्णय आचारसंहितेनंतर घेऊ परंतु मी सांगितलेले मुद्दे रेकॉर्डवर घेऊ. यामध्ये आपले स्ट्रक्चरल ऑडीट झालेले आहे का? तसेच आपल्याकडे त्या-मार्केटची रिडेव्हलपमेंटची पॉलिसी आहे का? ती जर नसेल तर पॉलिसी करावी लागेल. यामध्ये काही हेरिटेज स्ट्रक्चर असतील तर ते आहे तसे मेंटेन करावे लागतील. परंतु नंतरचे नॉन हेरिटेज स्ट्रक्चर असतील तर त्यांच्या रिडेव्हलपमेंटची पॉलिसी करावी लागेल. बीएमसीची यामध्ये पॉलीसी आहे, त्याप्रमाणे पाहून घ्या. तसेच रिडेव्हलपमेंट हे कार्पोरेशन करणार की प्रायव्हेटकडून एसआरए प्रमाणे करणार हे देखील ठरवावे लागेल. याप्रमाणे आपण स्टडी करावा व इंजिनियरींग डिपार्टमेंटमार्फत स्ट्रक्चरल ऑडीट करुन घ्या. तसेच रिडेव्हलपमेंटला मल्टिस्टोरेज मार्केटचा प्लॅन करा. ज्यामध्ये तुम्हांला खालील बाजूला मार्केटेबल गाळे असावेत तसेच फ्रीजर सेक्शन व नॉनव्हेज सेक्शन असले पाहिजेत, तसेच वरच्या मजल्यांवर मार्केटेबल गाळे उदा. कटलरी वगैरे असे असले पाहिजे. माझे हे सर्व मुद्दे घेऊन मार्केट डिपार्टमेंटने याचा स्टडी करावा व come with the praposale कारण ते रिडेव्हलप तर झाले पाहिजेत. नाहीतर कधीतरी ते मार्केट पडतील व त्याचे सर्वांना अडचण होईल. तसेच अगोदर सांगितले प्रमाणे एकवट प्रिमियमचा स्टडी

करुन संबंधीत डिपार्टमेंटने प्रस्ताव ठेवावा. तसेच याबाबतची संबंधीत स्टेक होल्डरची बैठक देखील आचारसंहितेनंतर ठेवावी. ते लायसन्स होल्डर आहेत त्यांचेशी चर्चा केली पाहिजे. तसेच आपल्याकडे गाळ्यांचे हस्तांतरण झालेले आहे का, आपल्याकडे त्यांचे रेकॉर्ड नसले तरी ते लोक नोटराईज्ड ॲग्रीमेंट करुन ठेवतात, ते देखील पाहिले पाहिजे. आपला लायसन्सी सोडून दुसराच लायसन्सी त्याठिकाणी धंदा करत असेल तर ते अलाऊड नाही. आपल्याकडे मार्केट इन्स्पेक्टरची पोस्ट असेल त्यांनी हे पाहणे आवश्यक आहे व त्यांनी ॲक्शन काय घेतली हे पाहिले पाहिजे. आपले सर्व मार्केट हे प्राईम पोझिशनवर आहेत. याठिकाणी आपल्याला आपल्या काही गोष्टी करायच्या असतील, आपल्या कोठी, चौक्या उभ्या करायच्या असतील तर त्याला देखील स्पेस उपलब्ध झाली पाहिजे. उद्या आपल्याला डिझास्टर मॅनेजमेंटसाठी काही मशिनरी तेथे ठेवायची असेल तर या रिडेव्हलपमेंटमध्ये त्याची तरतुद करता येईल. आपल्याला तेथे काही ऑफिसेस सुरु करता येतील. विशेषतः पेठांच्या भागातील मार्केटच्या ठिकाणी आपल्याला हे करावे लागेल. आपण आत्ता केले नाही तर केंव्हा करणार, कारण आपल्याला यामध्ये बाहेरुन कोणतीही सामग्री आणता येणार नाही. आपल्या प्रॉपर्टी या प्राईम लोकेशनवर असल्यामुळे त्या ऑन पार विथ मॉल झाल्या पाहिजेत. लोक म्युनिसिपल मार्केटमध्ये का जात नाहीत कारण तेथे अनहायजेनिक कंडीशन असते, गाळ्यांच्या साईजेस व बाहेर बसणारे हॉकर्स यामुळे. त्यामुळे हे सर्व आपण करावे. तोपर्यंत सदर विषयाचा विचार आचारसंहितेनंतर करण्यात यावा.

ठराव क्रमांक :– ७

संदर्भ–
१) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील ठराव क्र. ६/३३१, दि.२९/८/२०१९.
२) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील ठराव क्र. ६/५८, दि.२९/४/२०२०.
३) मा. स्थायी समिती ठराव क्र. २२०३, दि.१/०२/२०२२ रोजीचे पत्र.
४) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडीलआ.क्र. एफएमओ/४६०, दि.२७/७/२०२० रोजीचे पत्र.
५) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.३८४, दि. १०/७/२०२२ रोजीचे पत्र.
६) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.४००, दि. २०/७/२०२० रोजीचे पत्र.
७) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.४०३, दि. २०/७/२०२० रोजीचे पत्र.
८) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.४०४, दि. २०/७/२०२० रोजीचे पत्र.
९) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३६७, दि. २९/९/२०२० रोजीचे पत्र.
१०) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३६९, दि. ३०/९/२०२० रोजीचे पत्र.
११) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३८२, दि. १/१०/२०२० रोजीचे पत्र.
१२) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१३८३, दि. १/१०/२०२० रोजीचे पत्र.
१३) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१४०५, दि. ८/१०/२०२० रोजीचे पत्र.
१४) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१४०९, दि. ९/१०/२०२० रोजीचे पत्र.
१५) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१७२७, दि. ३/१२/२०२० रोजीचे पत्र.
१६) महात्मा फुले मंडई क ार्यालयाकडील आ.क्र.१७४३, दि. २४/३/२०२२ रोजीचे पत्र.
१७) महात्मा फुले मंडई कार्यालयाकडील आ.क्र.१७४२, दि. २४/०३/२०२२ रोजीचे पत्र.
१८) दि. ३०/०९/२०२० व दि. ६/१०/२०२२ मा.अति.महापालिका आयुक्त (वि) व मा. महापालिका आयुक्त यांचे आदेशानुसार.
१९) दि. १०/०७/२०२१ रोजी मा. महापालिका आयुक्त यांचे तोंडी आदेशानुसार.
२०) विधी विभाग, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील जा.क्र.१३३९, दि.१३/६/२०२२.
२१) मालमत्ता व व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयाकडील जा.क्र. २१७९, दि.२३/०६/२०२२.
२२) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मंडई/११ दि.१२/४/२०२३ चे पत्र.
२३) स्थायी समिती ठराव क्र.५२,दि.१७/४/२०२३
२४) मनपा ठराव क्र.४९, दि.२६/४/२०२३
२५) मनपा ठराव क्र.५१, दि.३०/५/२०२३
२६) मनपा ठराव क्र.७३, दि.२०/६/२०२३
२७) मनपा ठराव क्र.१३५, दि.२५/८/२०२३
२८) मनपा ठराव क्र.२११,दि.२०/१०/२०२३
२९) मनपा ठराव क्र.२८५,दि.२०/१२/२०२३
३०) मनपा ठराव क्र.३७६,दि.१४/२/२०२४

विषय– मंडई विभागाकडील गाळ्यांचा करारनामा व नवीन मुल्यांकना नुसार भाडे वाढ करणेबाबत.

–––––

विषय क्र. ७ चा विचार आचारसंहितेनंतर करण्यात यावा.

निर्णय : सदर विषय तहकुबी संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्र. ८

संदर्भ क्र.: १) दि. ६/४/२०२४ रोजी मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयात झालेली बैठक व दिलेले आदेश.
२) मा.उप आयुक्त, मालमत्ता व व्यवस्थापन विभाग यांचेकडील जा.क्र. माव्य/१९३, दि.८/४/२०२४ अन्वये प्रस्ताव (या कार्यालयाकडील आ.क्र. एलएएम ८८, दि. ८/४/२०२४)
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/१०, दि. ८/४/२०२४ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११, दि. १२/४/२०२४.

---

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

पुणे पेठ शिवाजीनगर गणेशखिंड रस्ता येथील चाफेकर पुतळा ते संचेती हॉस्पिटल दरम्यानच्या ४५ मी.डी.पी. रस्ता रुंदीकरणासाठी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यातील यादीनुसार बाधित मिळकतींचे सुमारे १४१३१.५६ चौ.मी. आरक्षित जागा नवीन भूसंपादन कायदा २०१३ नुसार संपादन करणेस व त्या अनुषंगाने भूसंपादन प्रस्ताव विहित नमुन्यात मा.जिल्हाधिकारी, भूसंपादन शाखा पुणे यांजकडेस सादर करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**मा.प्रशासक :** आपल्या ॲक्टच्या ७९ मध्ये ॲक्वायरींग प्रापर्टी देखील येत असतील. यामध्ये मी कालही सांगितले होते की, एमआरटीपीचे सेक्शन ५६ पहावे. हा सेक्शन वाचा.

**मा.मुख्य विधी अधिकारी : 56. Power to require removal of authorised development or use.** (1) If it appears to a Planning Authority that it is expedient in the interest of proper planning of its areas (including the interest of amenities) having regard to the Development plan prepared,— (a) that any use of land should be discontinued, or (b) that any conditions should be imposed on the continuance thereof, or (c) that any buildings or works should be altered or removed, the Planning Authority may, by notice served on the owner,— (i) require the discontinuance of that use; or (ii) impose such conditions as may be specified in the notice on the continuance thereof ; or (iii) require such steps, as may be specified in the notice to be taken for the alteration or removal of any buildings or works, as the case may be, within such period, being not less than one month, as may be specified therein, after the service of the notice. (2) Any person aggrieved by such notice may, within the said period and in the manner prescribed, appeal to the State Government. (3) On receipt of an appeal under sub-section (2), the State Government or any other person appointed by it in this behalf may, after giving a reasonable opportunity of being heard to the appellant and the Planning Authority, dismiss the appeal or allow the appeal by quashing or varying the notice as it may think fit. (4) If any person,— (i) who has suffered damage in consequence of the compliance with the notice by the depreciation of any interest in the land to which he is entitled or by being disturbed in his enjoyment of the land or otherwise ; or (ii) who has carried out any works in compliance with the notice, claims, from the Planning Authority, within the time and in the manner prescribed compensation in respect of that damage, or of any expenses reasonably incurred by him for complying with the notice, then the provisions of sub-sections (2) and (3) of section 51 shall apply in relation to such claim as those provisions apply to claims for compensation under those provisions. (5) If any person having interest in land in respect of which a notice is issued under this section claims that by the reason of the compliance with the notice, the land will become incapable of reasonably beneficial use, he may within the period specified in the notice or within such period after the disposal of the appeal, if any, filed under sub-section (2) and in the manner prescribed, serve on the State Government a purchase notice requiring his interest in the land to be acquired ; and thereupon, the provisions of section 49 for dealing with a purchase notice shall, so far as can be made applicable, apply as they apply to a purchase notice under that section.

